**ठळक बातम्या**

- अनुसूचित जाती आणि जमाती दर्जा फक्त हिंदू, शीख किंबा बौद्ध धर्मीयांनाच मिळू शकेल, असा सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा
- रेल्वे तिकीट रद्द करण्याच्या शुल्कात बदल, ८ तास आधी तिकीट रद्द केलं तर कुठलाही परतावा नाही
- होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी अमेरिकेकडून ५ दिवस मुदतवाढ
- जादा परताव्याचं अमिष दाखवून फसवणूक करण्याच्या प्रकरणांचा निकाल लौकर लागावा याकरता कायद्यात बदल करण्याची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांची घोषणा

**आणि**

- महिला क्रिकेटमधे दक्षिण अफ्रिकेविरुद्धच्या टी-ट्वेंटी मालिकेसाठी भारताचा संघ जाहीर

**<><><><><>**

हिंदू, शीख किंबा बौद्ध धर्माची अनुयायी असणारी व्यक्तीच अनुसूचित जाती आणि जमातींसाठीच्या फायद्यांसाठी दावा करू शकेल. ख्रिस्ती धर्मासारख्या इतर कोणत्याही धर्मात धर्मांतर करणाऱ्या व्यक्तिचा अनुसूचित जातीची श्रेणी रद्द होईल, असं सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. या तीन धर्मांव्यतिरिक्त इतर धर्मांत धर्मांतर केलेली कोणतीही दलित व्यक्ती अनुसूचित जाती आणि जमातींवरच्या अत्याचार प्रतिबंधक कायद्याचं उल्लंघन झाल्याचा दावा करू शकत नाही, असं न्यायालयाने म्हटलं आहे. आंध्र प्रदेशातल्या एका ख्रिस्ती धर्मगुरूने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. त्यावर न्यायमूर्ती पी. के. मिश्रा आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या पीठासमोर आज सुनावणी झाली. संबंधित याचिकाकर्त्याने यापूर्वी आपल्यासोबत जातीय भेदभाव

आणि छळ होत असल्याचा दावा करत काही जणांविरुद्ध खटला दाखल केला होता. मात्र आरोपींनी हा खटला रद्द करण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. याचिकाकर्त्याने ख्रिस्ती धर्मात धर्मांतर केल्यामुळे त्याची अनुसूचित जातीची श्रेणी रद्द होत असल्याचा निर्णय उच्च न्यायालयानेही दिला होता.

**<><><><>**

केंद्र सरकारने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे देशातल्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाल्याची माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं.

**होल्ड.. बाईट- शिवराजसिंह चोहान**

प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी अंतर्गत शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपयांची आर्थिक मदत थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते, असंही चौहान म्हणाले.

दरम्यान, लोकसभेत आज वित्त विधेयक २०२६ वरची चर्चा पुन्हा सुरू होईल. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी केंद्र सरकारच्या आर्थिक प्रस्तावांची अंमलबजावणी करणारं हे विधेयक आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल सभागृहात हे विधेयक मांडलं होतं. पारलिंगी व्यक्ती हक्क सरंक्षण कायदा २०१९ हे विधेयकही सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार आज लोकसभेत मांडतील. राज्यसभेत विनियोग विधेयक २०२६ पुढील चर्चेसाठी घेतलं जाईल. हे विधेयक आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या सेवांसाठी भारताच्या एकत्रित निधीतून ठराविक रक्कम काढण्याबाबत आणि ती खर्च करण्याबाबत सरकारला अधिकार देतं. लोकसभेनं गेल्या आठवड्यात हे विधेयक मंजूर केलं असून, राज्यसभेतल्या चर्चेनंतर ते पुन्हा लोकसभेकडे पाठवलं जाईल.

**<><><><>**

देशभरातल्या सहकारी क्षेत्राला बळकट करण्यासाठी केंद्र सरकारने गेल्या पाच वर्षांत पाच लाख कोटी रुपये वितरित केले आहेत, अशी माहिती सहकार

राज्यमंत्री कृष्ण पाल गुर्जर यांनी आज लोकसभेत पुरवणी प्रश्नांच्या उत्तरात दिली. ते म्हणाले की, राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाने १९६३ ते २०१४ या ५१ वर्षांच्या कालावधीत सहकार क्षेत्राला बळकट करण्यासाठी फक्त ५० हजार कोटी रुपये वितरित केले होते. मात्र, शेतकऱ्यांचं कल्याण हे सर्वोच्च प्राधान्य असल्यामुळे केंद्र सरकारनं प्रथमच दहा हजार कोटी रुपयांच्या निधीचं वितरण केल्याचं त्यांनी यावेळी म्हणाले.

<><><><>

पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज दुपारी राज्यसभेत भारताची भूमिका स्पष्ट करतील. लोकसभेत काल त्यांनी या संदर्भात देशातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी सरकारने उचललेल्या पावलांची माहिती दिली होती. गेल्या दशकभरात भारतीय मानक विभागात मोठं परिवर्तन झालं असून त्याची व्याप्ती, तांत्रिक क्षमता आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना मिळणाऱ्या प्रोत्साहनात वाढ झाल्याची माहिती केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांनी राज्यसभेत दिली. प्रश्नोत्तराच्या तासात एका प्रश्नाच्या उत्तरात ते म्हणाले की, उत्पादन आणि व्यापारात मानके आणि गुणवत्तेचं वाढतं महत्त्व लक्षात घेऊन सरकारने २०१५मध्येच या विभागात सुधारणा केल्या.

<><><><>

आसाम रायफल्सच्या स्थापना दिनानिमित्त संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या निमलष्करी दलाच्या सर्व बटालियन्सना शुभेच्छा दिल्या आहेत. या दलानं सीमाभागाचं तसंच इशान्य भागाच्या संरक्षणात महत्वाचं योगदान दिल्याचं सिंग यांनी समाजमाध्यमावरच्या  आपल्या संदेशात म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीसुद्धा आसाम रायफल्सला स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><>

भारतीय रेल्वेनं तिकीट रद्द करण्याच्या शुल्कात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रवासाला ८ तास शिल्लक असताना रेल्वेचं तिकिट रद्द केलं तर कुठलाही परतावा मिळणार नाही, अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत दिली.

सध्या ४ तास आधी तिकिट रद्द केलं तर कुठलाही परतावा मिळत नाही. प्रवास सुरू व्हायला ७२ तासापेक्षा कमी वेळ आणि २४ तासापेक्षा जास्त वेळ शिल्लक असेल तर रेल्वेच्या भाड्याच्या २५ टक्के शुल्क आकारले जाईल. सध्या ४८ तासापेक्षा जास्त आणि १२ तासापेक्षा कमी कालावधीत तिकिट रद्द केलं तर २५ टक्के शुल्क कापले जाते. प्रवासाला सुरुवात करायला २४ तासापेक्षा जास्त आणि ८ तासापेक्षा कमी वेळ शिल्लक असेल तर ५० टक्के रद्दीकरण शुल्क आकारले जाईल. सध्या १२ तासापेक्षा कमी आणि ४ तासापेक्षा जास्त वेळ असेल तर ५० टक्के शुल्क आकारले जात होते.

प्रवाशांच्या सुविधेसाठी प्रवास सुरू व्हायच्या अर्धा तास आधीपर्यंत प्रवास सुरू करण्याचे ठिकाण बदलण्याची सुविधा रेल्वेनं उपलब्ध करुन दिली आहे. यापूर्वी चार्ट तयार व्हायच्या आधीच प्रवास सुरू करण्याचे ठिकाण बदलता येत होते.

**<><><><><>**

होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासाठी इराणला दिलेली मुदत आणखी पाच दिवसांनी वाढवून तोपर्यंत इराणच्या वीजनिर्मिती प्रकल्पांवर हल्ले करणार नसल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल समाज माध्यमावर जाहीर केलं. अमेरिका आणि इराणच्या अधिकाऱ्यांमध्ये चर्चा यशस्वी झाली असून त्यातून तोडगा निघू शकेल अशी आशा ट्रम्प यांनी व्यक्त केली आहे. संघर्षावर तोडगा काढण्याच्या उद्देशाने दोन्ही बाजूंकडून प्रयत्न होत असल्यामुळे या वाटाघाटी आठवडाभर सुरू राहतील, असंही ट्रम्प यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

इराणच्या तेलव्यापारावरचे निर्बंध तात्पुरते शिथिल करण्याच्या आपल्या प्रशासनिक निर्णयाचंही ट्रम्प यांनी समर्थन केलं आहे. या निर्णयाचा उद्देश इराणला आर्थिक फायदा मिळवून देणं असा नसून, जागतिक तेल पुरवठा स्थिर करण्याचा आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं. दरम्यान अमेरिकेबरोबर काहीही चर्चा झाल्याचा इराणने काल इन्कार केला होता. परंतु आता मध्यस्थांमार्फत चर्चेचं आमंत्रण मिळाल्याचं आणि त्यावर विचार सुरु असल्याचं इराणने म्हटलं आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर देशातल्या शेअर बाजारांमधे आज चैतन्य दिसून आलं. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स सुरुवातीलाच एक हजार ५१६ अंकांनी वधारला आणि ७४ हजार २१२ अंकांवर पोहोचला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३८७ अंकानी वर गेला आणि २२ हजार ९०० वर पोहोचला.

<><><><><>

जादा परताव्याचं अमिष दाखवून फसवणूक करण्याच्या प्रकरणांचा निकाल सहा महिन्यात दिला जावा असा बदल कायद्यात करण्याचा निर्णय सरकारनं घेतल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला सांगितलं. याबाबत हेमंत ओगले यांनी प्रश्न विचारला होता. दिव्यांगाना प्रधानमंत्री आवास योजनेतून दिल्या जाणाऱ्या घरात रॅम्पची व्यवस्था केली जाईल असं गृहनिर्माणमंत्री अतुल सावे यांनी सांगितलं. विकसित महाराष्ट्र २०४७ धोरणांतर्गत दिव्यांगांना कौशल्य विकास तसंच स्वयंरोजगार प्रशिक्षण दिलं जातं अशी माहिती देत त्यांनी दिव्यांग बीजभांडवल योजनेंतर्गत अर्थसहाय्यात वाढ केली जाईल आणि स्पर्धा परीक्षेसाठीचे शुल्क कमी करण्याचा विचार केला जाईल अशी ग्वाही दिली.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या आंतराष्ट्रीय टी ट्वेंटी मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा निवड समितीने केली आहे. हरमनप्रितच्या नेतृत्वाखालच्या या संघात शफाली वर्मा, जेमीमा रॉड्रीग्ज, दिप्ती शर्मा आणि ऋचा

घोष या अनुभवी खेळाडूंबरोबरच काश्वी गौतम, क्रिंता गौड आणि श्री चारणी या तरुण खेळाडूंचा समावेश आहे. रेणुका ठाकुर, अरुंधती रेड्डी आणि श्रेयंका पाटील या गोलंदाजांचाही या समावेश आहे. दक्षिण आफ्रिकेत १७ एप्रिलपासून ही मालिका सुरु होईल.

//<><><><><>//